# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

दू.क्र.: ०२२-६२५४२१००/११०/१८८

संकेतस्थळ : www.msbte.org.in ई-मेल :

secretary@msbte.com


जा.क्र. मरातंशिमं/का-४०/लले/उ.प.२०२०/२०२०/०८० दि. 22 OCT 2020

**महत्वाचे परिपत्रक**

प्रति,

प्राचार्य,

मंडळाशी संलग्नीत सर्व संस्था

(AICTE मान्यताप्राप्त अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदविका संस्था.)

**विषय :- अंतीम सत्र/वर्ष MCQ based online परीक्षेकरिता विविध कारणाने गैरहजर असलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याकरिता अंतीम संधी देणेबाबत.**

संदर्भ :- १.मंडळाचे महत्वाचे परिपत्रक क्र. मरातंशिमं/का-४०/लले/उप२०/२०२०/०५९, दि.१०.०९.२०२०.

२. मंडळाचे महत्वाचे परिपत्रक क्र. मरातंशिमं/का-४०/लले/उप२०/२०२०/०७१, दि.३०.०९.२०२०

३. मंडळाचे महत्वाचे परिपत्रक क्र. मरातंशिमं/का-४२/उप२०/२०२०/२८०, दि.२४.०९.२०२०

४. मंडळाचे महत्वाचे परिपत्रक क्र. मरातंशिमं/का-४२/उप२०/FAQ/२८८, दि.०५.१०.२०२०

५. मंडळाचे महत्वाचे परिपत्रक क्र. मरातंशिमं/का-४२/उप२०/२०२०/२८५, दि.२९.०९.२०२०

अंतीम सत्र/वर्षातील विद्यार्थ्यांच्या उन्हाळी परीक्षा २०२० च्या आयोजनाबाबत मंडळाशी संलग्नीत सर्व संस्था, विद्यार्थ्यांना व पालकांना माहितीसाठी संदर्भ क्र. १ च्या महत्त्वाच्या परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते. त्यानुसार मंडळामार्फत अंतिम सत्र/वर्षातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा MCQ based ऑनलाईन पध्दतीने Smart Phone / Laptop/ Tablet/ Desktop इत्यादीचा वापर करुन दि. ०६.१०.२०२० ते दि. १७.१०.२०२० या कालावधीत घेण्यात आली होती. सदर परीक्षा संपल्यावर काही विद्यार्थी अतिवृष्टी, विद्युत पुरवठा खंडीत, नेटवर्कसंबंधीच्या अडचणी अशा विविध कारणास्तव परीक्षा देऊ शकले नाहीत, अशी निवेदने प्राप्त झाली आहेत.

संदर्भीय पत्र क्र. १ मध्ये मुद्दा क्र. ८ नुसार जे विद्यार्थी ऑनलाईन परीक्षा काही अपरिहार्य कारणामुळे देऊ शकणार नाहीत, अशा विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षा देण्याची एक संधी देण्यात येईल असेही नमुद करण्यात आले होते. त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, अतिवृष्टी, विद्युत पुरवठा खंडीत, नेटवर्कसंबंधीच्या अडचणी इ.कारणांमुळे अंतिम सत्र/वर्ष MCQ based online परीक्षेकरिता गैरहजर असणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षा देण्याची अंतिम संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर गैरहजर विद्यार्थ्यांची परीक्षा दि. २६.१०.२०२० व दि.२७.१०.२०२० रोजी खालील नमूद वेळापत्रकाप्रमाणे घेण्यात येणार आहे.

| परीक्षेचा दिनांक | विद्यार्थी गैरहजर असलेल्या सर्व विषयांची लिंक उपलब्ध असण्याचा कालावधी | शेरा |
|---|---|---|
| दि. २६/१०/२०२० ते दि.२७/१०/२०२० | सकाळी १०.०० ते संध्याकाळी ०५.०० वाजेपर्यंत | सदर कालावधीत विद्यार्थ्यांच्या Login मध्ये विद्यार्थी गैरहजर असलेल्या सर्व विषयांचे पेपर कोड परीक्षा देण्याकरीता उपलब्ध असतील. |

विद्यार्थ्यांनी गैरहजर असलेल्या सर्व विषयांची परीक्षा वरील नमूद वेळापत्रकानुसार देणे आवश्यक आहे. तदनंतर याबाबत कोणतीही संधी देण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी. विद्यार्थी गैरहजर असलेल्या विषयांच्या परीक्षेकरिता विद्यार्थ्यांना त्यांचे मोबाईल क्रमांकावर यापुर्वी एसएमएसद्वारे देण्यात आलेले Login ID, Passwords व link इ. Login credential वापरण्यात यावेत. Login ID, Passwords बाबत तसेच परीक्षा देतांना काही तांत्रिक अडचणी उद्भवल्यास आपल्या संस्थेतील विभागीय समन्वयकांशी (Institute Departmental Co-ordinator) संपर्क साधावा. तसेच त्यांचे स्तरावर विद्यार्थ्यांची तांत्रिक अडचणी दुर न झाल्यास मंडळाच्या संबंधित विभागीय कार्यालयातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. परीक्षेसंबंधी तांत्रिक अडचणी दूर करण्याकरीता संपर्कासाठी मंडळाच्या विभागीय कार्यालयातील अधिकाऱ्यांचे फोन नंबर/मोबाईल नंबर संदर्भीय पत्र क्र. २ अन्वये देण्यात आलेले आहेत.

ज्या विद्यार्थ्यांकडे ऑनलाईन परीक्षेकरिता इंटरनेट, संगणक, मोबाईल इ. सुविधा उपलब्ध नाहीत अथवा उपलब्ध होऊ शकणार नाहीत अशा विद्यार्थ्यांकरिता शेवटचा पर्याय म्हणुन ऑनलाईन परीक्षा नजिकच्या तंत्रनिकेतनात घेण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल. याकरिता अशा विद्यार्थ्यांनी त्यांचे संस्थेतील विभागीय समन्वयकांशी (Institute Departmental Co-ordinator) संपर्क साधावा. याकरिताचे नियोजन करण्याची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थी प्रवेशित असलेल्या संबंधित संस्थेची राहील.

संदर्भ क्र. ३ च्या महत्त्वाच्या परीपत्रकान्वये ऑनलाईन परीक्षेबाबत विद्यार्थ्यांकरीताच्या सुचना/ मार्गदर्शक तत्वे व संदर्भ क्र. ४ च्या महत्त्वाच्या परीपत्रकान्वये FAQ बाबत विद्यार्थ्यांना कळविण्यात आले होते. तसेच संदर्भ क्र. ५ च्या महत्त्वाच्या परीपत्रकान्वये संस्थांना ऑनलाईन परीक्षेबाबत सुचना/ मार्गदर्शक तत्वे कळविण्यात आली होती. सदर सुचना/ मार्गदर्शक तत्वे विद्यार्थी व संस्था यांना गैरहजर विद्यार्थ्यांची परीक्षा घेतांना लागू राहतील, याची नोंद घ्यावी.

विविध कारणांमुळे गैरहजर असलेल्या सर्व विद्यार्थ्यांची यादी संस्थेच्या Dashboard वर उपलब्ध करुन देण्यात येईल. गैरहजर असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना उपरोक्त बाब निदर्शनास आणुन देण्यात यावी. अंतिम सत्र/ वर्षातील विद्यार्थ्यांकरीता उन्हाळी-२०२० या परीक्षेची ही अंतिम संधी असल्याने संस्थेतील विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही, याबाबतची पुरेपूर दक्षता घेण्यात यावी.

विर.जा।१।४।५

(वि. र. जाधव)
प्र. सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता –

उपसचिव, मंडळाचे विभागीय कार्यालय-मुंबई, पुणे, औरंगाबाद व नागपुर.